# विज्ञानप्रेमी पु. ल. देशपांडे (www.mngogate.com) मधील लेख M02 -- **म. ना. गोगटे**

(12 जून 2001 रोजी प्रथम स्मृतीदिनानिमित्त आदरांजली)

पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तीमत्व विविधांगी होते. साहित्य, नाट्य, चित्रपट, संगीत ही क्षेत्रे त्यानी गाजवली. त्यांचा एक कमी परिचित असा पैलू म्हणजे मराठीतून विज्ञानप्रसार व्हावा व समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा याबद्दल त्यांना खूप आस्था होती. त्याबाबत काही नोंदी येथे करत आहे. 1966 मध्ये स्थापन झालेल्या मराठी विज्ञान परिषदेचे कार्यालय 1983 पासून विज्ञान भवन, पुरव मार्ग, मुंबई 400022 येथे आहे. मराठा मंदिर (नायर रोड, मुंबई 400008) या संस्थेने "अस्मिता महाराष्ट्राची " हा ग्रंथ 1971 मध्ये प्रसिद्ध केला. संपादक डॉ भीमराव कुलकर्णी यानी 53 तज्ञांचे लेख त्यात समाविष्ट केले आहेत. परिषदेची स्थापना व जडणघडण यातले माझे योगदान पाहून एक लेख मी द्यावा असे संपादक म्हणाले. या ग्रंथातील " स्वागतपर गद्य " अशा मथळ्याची प्रस्तावना पु. ल. देशपांडे यांची आहे. प्रस्तावनेतील काही भाग ---

" विज्ञानयुगाचा सूर्य उगवून कितीतरी वर आला पण त्याची किरणे आमच्या मनःपटलाला अजून उजळवीतच नाहीत. श्री यदुनाथ थत्ते यांचा "विज्ञानयुगातील अस्मिता " आणि श्री मधुकर ना. गोगटे यांचा "विज्ञानाभिमुख महाराष्ट्र " हे दोन्ही लेख अत्यंत महत्वाचे आहेत. "विज्ञानातले पांडित्य म्हणजे वैज्ञानिक दृष्टी नव्हे " हा श्री. गोगटे यांचा विचार फार मोलाचा आहे. मी जीवनातली कोडी बुद्धीने आणि अभ्यासाने जाणून घेईक, ही जिद्द आणि मला ती जाणता येतील हा आत्मविश्वास म्हणजे वैज्ञानिक दृष्टी. माणसाला अज्ञात अशा असंख्य गोष्टी आहेत. परंतु त्या अज्ञाताचा भेद करून ते मी ज्ञात करून घेईन, या धडाडीने निसर्गाचे विराट स्वरूप जाणून घेणे हे वैज्ञानिकांचे कार्य आहे. आणि ते वैयक्तिक साक्षात्काराच्या समाधानात न राहता, त्या ज्ञानाभोवती कसलीही गूढ वलये वा बुवाबाजी न करता, ते ज्ञानसोपान स्वच्छपणे ग्रंथातून दाखवणारे वैज्ञानिक हे जगाचे खरे उपकर्ते आहेत. वैयक्तिक मोक्षाकडून सामाजिक मोक्षाकडे नेणारे विज्ञान हे जपतपअनुष्ठानांपेक्षा अधिक तारक आहे. विठ्ठलास अठ्ठावीस युगात हटवता न आलेला पंढरपुरातला कॉलरा विज्ञानाने हटवला... नव्या मोटारीपुढे नारळ फोडून तिची गुलाल लावून पूजा करणारे मोटार नावाची एक नवीन देवता निर्माण करतात. ते मनाने वैज्ञानिक झालेले नसतात. खंडाळ्याच्या घाटात एक शिंगरोबाचे देऊळ आहे. त्याला दहा पैसे ठेवून प्रवास निर्विघ्न कर असे म्हणणाऱ्यांना दहा पैशाच्या जकातीवर देव खुष होतो, हा देवाचा अपमान आहे असे वाटत नाही. त्या शिंगरोबाला दहा हजार रुपये दिले तरी पेट्रोलशिवाय मोटार चालणार नाही.... वैज्ञानिकानी आता विज्ञान परिषद स्थापन केली आहे, तिचे फार मोठ्या उत्साहाने स्वागत व्हायला हवे. लहान मुलांचे विज्ञानाने केलेल्या प्रगतीविषयी कुतूहल विलक्षण आहे. खरे सांगायचे तर विज्ञानाच्या बाबतीत आमची पिढी ह्या पोरांपुढे साक्षात अडाणी आहे... चंद्रावरच्या स्वारीचे माझे शिक्षण कुटुंबातील बालगोपालानी केले आहे. हे सारे ज्ञान त्यानी मराठी पुस्तकांतून व लेखांतून मिळवले आहे. मराठी परिभाषेला हसणारे लोक मराठी भाषेला मिळणाऱ्या या नव्या शक्तीकडे पाहतच नाहीत... "

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील मानबिंदु होय. मराठी भाषेविषयी आगळेवेगळे प्रयोग होत असतात. उदा पुण्यातील केसरी या मराठी दैनिकाने वर्षभर ब्रेल लिपीत अंधव्यक्तींसाठी आवृत्ती काढली. विदेशात मराठी घरातील बालकांना व परकीयांना देवनागरी येत नसल्याने एका लेखकाने रोमन लिपीत काही मराठी कविता केल्या. एका संशोधकाने देवनागरी लिपी गणकयंत्रावर बसवून मराठीला या आधुनिक तंत्राचा लाभ दिला. अशा उपक्रमांचा निर्देश संमेलनाध्यक्षानी करावा की नाही हा त्यांचा वैयक्तीक अधिकार असतो. भाषणास वेळेची मर्यादा असते. येथे पुल यांची थोरवी दिसून येते. संगीततज्ञ असल्यामुळे दाद देणे त्यांच्या स्वभावात होते. इचलकरंजी येथे (सन 1974) 50 व्या मराठी साहित्य संमेलनात अध्यक्ष म्हणून ते म्हणाले -----
" .. ललित वाङ्मय हा माझ्या प्रेमाचा विषय आहे. वैचारिक वाङ्मयाविषयी मला आदर आहे. मराठी भाषा व साहित्यविषयक संशोधन आणि कोशवाङ्मयाचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांच्या त्यागपूर्ण सेवेबद्दल माझ्या मनात कृतज्ञता आहे. मराठी विज्ञान परिषदेच्या धडपडीची मला जाणीव आहे. मी बालवाङ्मयाविषयी वा लोकवाङ्मयाविषयी बोललो नाही. ही सर्व निराळ्या तज्ञतेची क्षेत्रे आहेत, मराठीला समृद्ध करणारी आहेत. या कार्यातल्या सर्व लेखक संशोधकांना मी वंदन करतो..."

पुल फाउंडेशनने कित्येकाना उदार देणग्या दिल्या हे सर्वश्रुत आहे. मराठी विज्ञान परिषदेस त्यानी (1988 ते 1991) या काळात चार वेळा देणगी दिली (एकूण रु 75000). तीन वर्षांपूर्वी या फाउंडेशनचे विसर्जन झाले. काही वर्षांपूर्वी पुण्यात रूपाली या इमारतीत एका फ्लॅटमध्ये पुल रहात होते. पुलंच्या निधनोत्तर त्यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुनीता देशपांडे यानी औदार्याने हा स्वतःचा फ्लॅट भारतीय विद्याभवन संस्थेला देणगी म्हणून दिला. (फ्लॅटविक्रीची रक्कम देणगीच्या हेतुसाठी वापरली जाईल). तसेच त्यानी 25 लाख रुपयांची एक देणगी पुण्यातील आयुका या संस्थेला दिली. या दोन्ही देणग्यांचा उपयोग लहान मुलांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून सुसज्ज संशोधनशाला उभ्या करण्यासाठी करावा व दोन्ही प्रकल्पांना मुक्तांगण असे नाव द्यावे, अशी अट आहे.

नामवंत वैज्ञानिक डॉ वसंत गोवारीकर यांना 1994 मध्ये जागतिक मराठी परिषदेचे अध्यक्षपद देण्यात आले. त्यानिमित्त लेखी संदेशात (प्रकृती ठीक नसल्याने अनुपस्थित) मावळते अध्यक्ष पु. ल. म्हणतात - "...महाराष्ट्रातील खेड्यात जाऊन विज्ञानप्रसार करणाऱ्या मराठी विज्ञान परिषदेचे कार्य प्रशंसनीय आहे. ही संस्था अधिक समर्थ कशी होईल यावर जागतिक मराठी परिषदेने विचार करावा...". पुलंना मी अनेकदा भेटलो होते. त्यानी व्यक्त केलेली पुढील मते मला महत्त्वाची वाटली. (1) वैज्ञानिक परिभाषा सोपी असावी. उदा. कुक्कुटपालन ऐवजी कोंबडीपालन हा शब्द सोपा व खेडुतांना परिचित आहे. (2) खंडाळा घाटात शिंगरोबा देवळाजवळ एक मोठा फलक ठेवावा. तो घाट व तेथील बोगदे कुणा दैवी शक्तीने तयार केले नसून विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या त्या करामती आहेत हे ठळक रीतीने त्या फलकावर लिहावे. (3) मुंज या कालबाह्य विधीस व जेथे आहेर घेतले जातात अशा विवाहसमारंभास पु.ल. उपस्थित रहात नाहीत. असो. पुलंच्या स्मृतीला वंदन.

*प्रसिद्धी -- मराठी विज्ञान परिषद पत्रिका व अंतर्नाद (जून 2001)(जुलै 2001 दुरुस्तीसह)*
लेखकसंपर्क वेबसाईटच्या इंडेक्सपानावर